Sunday, December 29, 2024
2:19 PM

## अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २९/१२/२०२४

➢ दुखापत :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | भादंवि/सि आरपीसी कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | नागपुरीगेट अप क्र 486/2024कलम 118(1), 352 बि.एन.एस | कलम ३२४, ५०४, भादवि | बिसमिल्ला नगर अमरावती | दि.28/12/24 चे 20.00 दावेळदि.28/12/24 चे 22.25 | एक महिला | फिर्यादीचा पती | यातिल फिर्यादी व आरोपी हे पत्नी व पती असुन आरोपी हा काही कामधंदा करीत नाही दार गांजा पिण्याचा सवईचा आहे नमुद घटना वेळी व ठिकाणी फिर्यादीने घरा मध्ये स्वयपाक बनविला त्यावेळी आरोपी हा बाहेरुन दारु पिवुन घरी आला फिर्यादी सोबत भांडण करुन शिवीगाळ केली व विठ घेवुन डोक्यावर मारले फिर्यादीचे रिपोर्ट व मेडीकल सर्टिफिकेट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ०२ | पो स्टे राजापेठ अप क्र ७५७/२४ कलम ३३३, ११८(१), १२५, ३५२, ३५१(२), ३(५), भा.न्या.सं. | कलम ४५२, ३२४, ३३६, ५०४, ५०६, ३४ भादवि | गोपाल नगर अमरावती | घ ता वेळ दि. २८/१२/२०२४ चे १६.३० वा दरम्यान<br><br>दा.ता.वेळ दि. २८/१२/२४ चे १९.३६ वा | एक महिला | १. एक महिला<br>२.तेजस सहारे<br>३.सुरेश सहारे<br>सर्व रा. गोपाल नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी व गैरअर्जदार हे एकमेकांचे शेजारी राहत असुन फिर्यादीच्या मुलाशी गैरअर्जदार यांच्या मुलीने दोन महीण्या पुर्वी प्रेमवीवाह झाला आहे. नमुद घ. ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हे घरी झाड झुड करीत असतांना आरोपी क्र १,२ व ३ हे फिर्यादीचे घरी शिवीगाळ करुन शिरले तसेच आरोपी सुरेश सहारे याच्या हातात सब्बल होता व आरोपी तेजस यांच्या हातात विटा होत्या व आरोपी क्र १ हीच्या हातात तिखट मिरचीचे पावडर होते .सुरेश सहारे यांनी त्याचया हातातील सब्बल फिर्यादीच्या दोनही पायावर व डाव्या डोळयाच्या भोईवर मारुन जखमी केले तसेच तेजस याने त्याच्या हातातील वीटा फिर्यादीच्या डोक्यावर व पाठीवर मारुन जखमी केले. आरोपी क्र १ हिने तीच हातातील तिखट फिर्यादीच्या डोळयात फुंकुन गंभीर रीत्या जखमी केले. अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन व मेडी सर्टी. वरुन गुन्हा दाखल |

➢ घरफोडी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | भादवि सि आरपीसी कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. (गुन्हेगारी पुर्व इंतिहास) | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अप.क्र. १०७७/२०२४ कलम ३०५(अ), ३३१(४) भा.न्या. संहीता | कलम ३८०, ४५७, भादंवि | हनुमान मदिरा समोर ५२(अ) चैतन्य कॉलनी अमरावती | दि. २८/१२/२०२४ चे ०२.३० वा दाखल ता. वेळ दि. २८/१२/२०२४ चे १८.३० वा | रामकृष्ण चंपतराव भुरडे वय ८५ वर्ष रा. हनुमान मदिरासमोर ५२(अ) चैतन्य कॉलनी अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी पो.स्टे. ला येवून जवानी रिपोर्ट दिला आहे की, दि. २६/१२/२०२४ रोजी दुपारी ०३.०० वा फिर्यादी हा त्याचे मुळ गावी शेतीचा कामाकरिता गेला असता त्याची पत्नी ही घरी एकटीच होती. दिनांक. २८/१२/२०२४ रोजी सकाळी ०७.०० वा फिर्यादीने फोन करून सांगीतले की, आपल्या घरी रात्री ०२.३० वा चे सुमारास मला बेडरूम मधील कपाट बंदकरण्याचा आवाज आला. जावून पाहणी केली असता एक सोन्याची चेन किमत ५०००० रू. एक नेकलेस किमत २५००० रू व नगदी १००० रू. असा एकुण ७६००० रू. चा मुद्येमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे. अशा फिर्यादीचे जवानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |
| ०३ | गाडगेनगर अप.क्र ११०७/२४ कलम ३३१(३), ३३१(४), ३०५(ए) बी.एन.एस. | कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि | विदयुत नगर जवळ हार्दीक कॉलनी गुरुदेव नगर अमरावती | दि. २३.१२.२०२४ चे सकाळी ०८.३०वा ते दि २७.१२.२०२४ चे २१.०० वा. दाखल दि. २८.१२.२०२४ चे १७.०८ वा. | गणेश रंगपनाथ कोलते वय ६६ वर्ष रा विदयुत नगर जवळ हार्दीक कॉलनी गुरुदेव नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी हे त्यांचे कुटुबातील लोक सह भुसावळ येथे फॅमिली प्रोग्राम असल्यामुळे कार्यक्रमाला गेलो असता नमुद घ ता वेळी व ठिकाणी घराशोजारी राहणारे नारखेडे यांचा फोन वर माहीती मिळाली की ,घराचा कुलुप कोंडा तुटलेला दिसला वरुन मित्राला पाहण्याकरिता सांगितले असता घराचे दाराचे कुलुप कोंडा तुटलेला दिसला.फिर्यादी आजरोजी परत आले त्यांनी पाहणी केली असता घरातील वस्तु टु व्हीलर अॅक्टिवा गाडी क्र एम एच २७ बी एच २०९३ किं अं ३००००/- रु मंगळसुत्र ५ ग्रॅम मनी व २ ग्रॅम डोरले कि अं ५००००/- ,एक एक ग्रॅम च्या दोन अंगठ्या कि १५०००/- चांदीची समई १५ ग्रॅम ची कि १३००/-, चांदीचे शिक्के दोन २० ग्रॅमचे किं १८००/- ,राणी शिक्का चांदीचा २५ ग्रॅम चा किं २२००/- रु व रोख रककम ४०,५००/- रु असा एकुण १,४०,८००/- रु चा माल कोणीतरी अज्ञात चोराने बंद घराचे कुलुप तोडुन चोरुन नेला.अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा नोंद |

➢ चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | भादवि सि आरपीसी कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो.स्टे. फ्रेजरपुरा अप.क्र. १०७८ /२०२४ कलम ३०५(१) भा.न्या. संहिता | कलम ३८० भादंवि | सर्वोदय कॉलनी अमरावती | दि. २८/१२/२०२४ चे ११.३० वा ते ०१.२५ वा दरम्यन दाखल दि. २८/१२/२०२४ चे २०.४० वा | पंकज वसंतराव गोडकर वय ३८ वर्ष रा. बेलोरा ता. चांदुरबाजार जि. अमरावती ह.मु. सर्वादय कॉलनी अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हा दि. २८/१२/२०२४ रोजी त्यांचे कुटूबासह कंपनीचे कार्यक्रमासाठी बाहेर गेला होता. त्यांनतर घरी परत आलो असता घराचे दरवाजाचे लॉक उघडे दिसली. घरात पाहणी केली असता ड्राव्हर मधील ठेवलेले नगदी नगदी १०००० रू व लॉकर मधून सोन्याचे टॉप्स किमत ९००० रू असा एकुण १९०००रू चा माल दिसून आला नाही. कोणीतरी अज्ञात चोराने घरात प्रवेश करून नमुद माल चोरून नेला. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

➢ जुगार रेड :-

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्ह्याचा प्रकार | चोरीस गेला /मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे बडनेरा | अप.क्र. ७८९/२०२४ कलम १२(अ) मजुका | जुगार | १ ते १० वरली मटका आकड लिहीलेली ४ चिठ्या व नगदी २६९०/- रु. दोन बॉल पेन कि.अं.२०/- रु. अस एकुण २७१०/- रु. | करीम उर्फ लाला हब्बु चौधरी रा. गवळीपुरा नवी वस्ती बडनेरा यांचे घरा जवळील सार्वजनि ठिकाणी | दि.२८.१२.२०२४ चे १४.१० वा. ते १५.०० वा. | दि.२८.१२.२०२४ चे १७.०९ वा. | सरतर्फे पोहेका गजानन नामदेवराव ढेवले ब.नं.१६९ गुन्हे शाखा अम. | १)अकबर मोहम्मद चौधरी वय- ३३ वर्ष रा. गवळीपुरा नवी वसती बडनेरा २)प्रदिप देवानंद अडकने वय- ३५ वर्ष रा. ईंदिरा नगर नवी वस्ती बडनेरा ३)करीम उर्फ लाला हब्बु चौधरी रा. गवळीपुरा नवी वस्ती बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीप्रमाणे पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर जुगार रेड केली असता त्याच्या ताब्यातुन १ ते १० वरली मटका आकड लिहीलेली ४ चिठ्या व नगदी २६९०/- रु. दोन बॉल पेन कि.अं.२०/- रु. अस एकुण २७१०/- रु. चा माल मिळुन आला. वरून सदरचा गुन्हा दाखल |